**Publication: Amrutwel Magazine**

**Headline: Boom in Gold Silver Market**

**Edition: Maharashtra & Mumbai**

**Date: June Issue, 2011**




# सोने-चांदी उद्योगात सदाबहार

**प्रश्न : सध्याचे सोने-चांदी मार्केट कसे आहे?**

एकदम फँटॅस्टिक. कोणी काहीही म्हणत असले तरी सध्याचे सोने-चांदीचे मार्केट खूपच चांगले आहे. सदाबहार म्हटलं तरी योग्य ठरेल. त्यासाठी अक्षयतृतीयेचे उदाहरण घेता येईल. अपेक्षेपेक्षा खूपच चांगली उलाढाल या मुहूर्तावर झाली. विक्रीत २० टक्के इतकी वाढ झाली. व्हॅल्यूनुसार (वाढता दर लक्षात घेता) हा परिणाम ५० टक्क्यांवर पोहोचतो. या काळात भारतीय बाजारपेठेतील आवकही चांगली झाली आहे.